सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २९/१२/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पोलीस-१८१९/प्र.क्र.१९४/पोल-५अ, दिनांक २८ डिसेंबर, २०२३.

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पोलीस-१८१९/प्र.क्र.१९४/पोल-५अ, २८ डिसेंबर, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१२२८१६०४३६७२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके/आस्थापना/प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
कार्यासन अधिकारी, का.क्र.०५.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-१८१९/प्र.क.१९४/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २८ डिसेंबर,२०२३

**वाचा :-**

१) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/ससे पोउनि (मुख्य) परीक्षा -२०२०/१०२/२०२२, दि.३०.११.२०२३

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२० मधून महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने शिफारस केलेल्या ५८३ उमेदवारांचे, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०१९ मधून उशिराने/प्रतिक्षायादी मधून शिफारस झालेल्या १६ उमेदवारांचे तसेच मागील प्रशिक्षण सत्रामध्ये मुदतवाढ घेतलेल्या २६ असे एकुण ६२५(५८३+१६+२६) उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे १२ महिन्यांचे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षण सत्र क्र.१२४ मध्ये दि.२४.११.२०२३ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२० मधून महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने शिफारस केलेल्या ५८३ उमेदवारांचे, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०१९ मधून उशिराने/प्रतिक्षायादी मधून शिफारस झालेल्या १६ उमेदवारांचे तसेच मागील प्रशिक्षण सत्रामध्ये मुदतवाढ घेतलेल्या २६ असे एकुण ६२५(५८३+१६+२६) प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर **दि.२४.११.२०२३ ते दि.२३.११.२०२४** या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने ही पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०२३-२४ व सन २०२४-२५ साठी " मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, १०९ जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल" या लेखाशिर्षाखाली संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१२२८१६०४३६७२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=f88a2df366dbf702eda9179bfdd100f151490e691798947c7f6d1b8cf0dab7d6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0585EFA444AE7B29EC4D54E290F9F826C6E4DE96799148FCFC4C6E13F203B34E, cn=GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2023.12.28 16:03:55 +05'30'

**( गणेश गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)